महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४ ई मेल: usecpr3.rdd-mh@nic.in

क्रमांक : व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.३१२/पंरा-३ दिनांक : ११/०२/२०२१

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय :- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ७ अन्वये घेण्यात येणाऱ्या ग्रामसभेच्या आयोजनास परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- १) विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : व्हीपीएम -२०२०/प्र.क्र. ३१२/ पंरा-३, दि. १५.०१.२०२१
२) समक्रमांकाचे शासन पत्र दि. २०.०१.२०२१

महोदया / महोदय ,

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ च्या शासन पत्रान्वये, दि . १५ जानेवारी, २०२१ च्या शासन परिपत्रकास दि.३१.०३.२०२१ पर्यंत स्थगिती देण्यात आली होती .

२. तथापि, ग्रामसभेच्या मंजुरी अभावी वार्षिक विकास आराखडे , शासनाच्या विविध योजना अंतर्गतच्या वैयक्तिक लाभार्थींची यादी , पुनर्वसित गावांचे प्रस्ताव , गौण खनिज परवानगी, थेट सरपंच विरुध्दातील अविश्वास प्रस्ताव , १४ व्या व १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च इ . बाबी प्रलंबित राहिलेल्या आहेत. तसेच , कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव देखील कमी झाला असून . जनजीवन पूर्ववत होत आहे .

३. उपरोक्त बाबी विचारात घेता, संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये , दि. १५ जानेवारी, २०२१ च्या परिपत्रकास दि.३१.०३.२०२१ पर्यंत देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत आहे . Social Distancing चे व कोविड -१९ च्या अनुषंगाने निर्गमित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अटीस अधीन राहून संदर्भ क्र . १ येथील परिपत्रकातील सूचनांप्रमाणे, पूर्वीप्रमाणे ग्रामसभांचे आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे .

(राजेश कुमार)
अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : १. विभागीय आयुक्त, सर्व विभाग
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, सर्व.

Download from ग्रामविकासदूत

Scanned by CamScanner